१५ वि

"लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत-
"लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर
सर्वसामान्यांसाठी सतत शिक्षण देण्याकरिता...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनो -२०१७/प्र.क्र. १४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ६ जानेवारी, २०१८.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक (Sovereign, Socialist, Secular, Democratic Republic) देश असून, त्यांनी त्रिस्तरीय लोकशाही पध्दत स्वीकारली आहे. ही लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने सन १९९२ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना "स्वतंत्र स्थानिक शासन" म्हणून सांविधानिक मान्यता देण्यात आली असून त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या घेण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

२. लोकशाही बळकटीकरणासाठी जरी सर्व स्तरावर लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक असला तरीही गेल्या दोन दशकात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अनुभव लक्षात घेता अनेक मुद्यांवर आता कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे, उदा. :-

(i) देशाच्या विकास प्रक्रियेमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, स्थान व भूमिका अधोरेखित करणे.

(ii) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असल्याची जाणीव करून देणे.

(iii) लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि बळकटीकरण (Preservation, Protection & Strengthening) करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोग आणि शासनाबरोबरच सर्वांचीच आहे, याबाबत व्यापक कार्यक्रम हाती घेणे, इत्यादी.

३. वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २-३ वर्षांमध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचे व त्यांच्या निवडणुकांचे महत्व, याबाबत सर्व स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांना अवगत करणे.

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संशोधन करणे.

(iv) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जाद्वारे "१८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे", या आशयाचे प्रमाणपत्र घेणे;

(v) विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्रथम वर्षाच्या सर्व विषयांसाठी **"लोकशाही, निवडणूक व सुशासन"** हा विषय अनिवार्य करणे, इत्यादी.

४. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर एक राष्ट्रीय परिषद मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये "लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व लोकांना आवश्यक त्या सर्व विषयांवर सतत शिक्षणाद्वारे जागरुक करणे आवश्यक आहे" ही बाब दिसून आली. म्हणून "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर सर्व लोकांना सतत शिक्षण देण्यासाठी काही नवीन उपाययोजना करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आ दे श**

(अ) राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा.

आपार्व



(ब) प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या सर्व शासकीय / निमशासकीय कार्यक्रमामध्ये मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व; निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी निर्भीडपणे काम करण्याची गरज; लोकशाही जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व लोकांनी जागरुक राहण्याची गरज, इत्यादी विषयांचा समावेश असावा.

(क) तसेच दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यक्रमांमध्ये व तसेच मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. ("ब" प्रमाणे) "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाचे बॅनर्स लावण्यात यावेत.

(ड) या कालावधीत (दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुववारी) सर्वांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर वरील विषयावर (लोकशाही, निवडणूक व सुशासन) जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी, उदा.-

(i) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या विषयावर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करावे.

(ii) सर्व उद्योग समूहांनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे.

(iii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी निवडणुकीच्या वेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुलामंच/खुलीचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित करावेत.

(iv) वृत्तपत्रे, मासिके यासारख्या छापील, सोशल मीडिया व स्थानिक केबल नेटवर्क यांचा वापर करून उपरोक्त कालावधीत ७३ व ७४ वी राज्य घटना दुरुस्ती, त्याअनुषंगाने निर्माण करण्यात आलेली लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत माहिती द्यावी.

(v) आवश्यक त्या ठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर्स, (टी.व्ही., रडिओ, प्रेस, इत्यादी) लावणे.

(vi) सर्वांची मदत घेणे, उदा. रेस्टॉरन्ट/हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स, इत्यादी

५. पंधरवडा योग्य रितीने साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांच्या सचिवांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सर्व सूचना द्याव्यात.

६. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त; तसेच विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रुपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा होईल, याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( [illegible] चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. सचिव (सर्व विभाग)
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. सर्व विद्यापीठे
९. राज्य निवडणूक आयोगातील कार्यासने
१०. निवड नस्ती

## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/रापनो-२०१७/लोकशाही पंधरवडा/प्र.क्र.१४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ जून, २०१९.

प्रति,
मा.विभागीय आयुक्त (सर्व)
मा. जिल्हाधिकारी (सर्व)
मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय:- दिनांक २६ जानेवारी, २०१९ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्यासंदर्भात...

संदर्भ:- १. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ चे आदेश
२. आयोगाची समक्रमांकाची दिनांक २९/११/२०१८ व ४/१२/२०१८ ची निर्देश पत्रे

महोदय/महोदया,

आपल्याला माहितच आहे की, लोकशाही सुदृढ व्हावी यादृष्टीने समाजातील सर्व लोकांना सतत शिक्षणाद्वारे जागरुक करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संदर्भ क्र. १ येथील आदेश दिनांक ६ जानेवारी, २०१८ अन्वये राज्यस्तरापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याचे ठरविले आहे.

२. राज्यातील पहिला "लोकशाही पंधरवडा" २०१८ साली दिनांक २६/१/२०१८ ते १०/२/२०१८ या कालावधीत, अत्यंत कमी कालावधी असतानाही आपल्या पुढाकाराने यशस्वीरित्या पार पाडण्यात आला.

३. २०१९ साली आणखी मोठ्या प्रमाणावर हा पंधरवडा साजरा करण्यात यावा यादृष्टीने संदर्भ क्र. २ नुसार ३ ते ४ महिने अगोदर निर्देश देण्यात आले. या पंधरवड्याच्या आयोजनाकरिता योग्य असा

वेळ मिळाल्यामुळे हा पंधरवडा अत्यंत भव्य प्रमाणात साजरा होऊ शकला. यावेळी अनेक नवीन उपक्रम आपल्या सहकार्याने राबविण्यात आले.

४. सन २०२० साली हा पंधरवडा योग्य रितीने राबविण्यात यावा याकरिता आतापासून कार्यक्रमाचे नियोजन करणे योग्य राहील. मात्र, हे करताना खालील बाबींकडे लक्ष ठेवणे आवश्यक राहील :-

(i) सप्टेंबर-ऑक्टोबर-२०१९ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका

(ii) २०२० मध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका (सुमारे १५,०००)

५. "लोकशाही पंधरवड्या" चा वापर २०२० मध्ये होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरिता चांगल्या पध्दतीने होऊ शकतो. म्हणून वरील बाबी लक्षात घेता २०२० साली साजरा होणाऱ्या "लोकशाही पंधरवड्या" साठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

(१) प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या टप्प्यांवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राह्य धरण्यात येणारा दिनांक आयोगाकडून घोषित करण्यात येत असल्याने नव्या मतदारांना मतदार यादीत नोंदणीसाठी पूर्वसूचना मिळते. याद्दष्टीने सर्वंकष मतदार नोंदणी अभियान व्यापक स्वरुपात राबविणे.

(२) लोकांचा सक्रीय सहभाग वाढेल असे उपक्रम राबविणे.

(३) या व्यतिरिक्त आपणाकडून मागील दोन वर्षात राबविण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण कल्पना

(४) महानगरांजवळ वसलेल्या आकाराने मोठ्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणी व मतदानासंदर्भात जागृतीसाठी विशेष प्रयत्न करणे .

(५) आरक्षित जागांवर उमेदवारी अर्ज भरण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तिंसाठी जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करणे .

(६) आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था उदा" Lions Club, Rotary Club" यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीम राबविणे .

(७) राज्य निवडणूक आयोग हे शासनापेक्षा स्वतंत्र असल्याचे व त्याबाबतची सविस्तर माहिती वृत्तपत्र व साप्ताहिकामध्ये प्रसिध्द करणे.

(८) व्यापारी उद्योगपती यांची बैठक घेऊन मतदार यादी जागृती अभियानाची व्यापक , प्रसिध्दी करण्यासाठी त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घ्यावे.

(९) मतदान केंद्रातील सर्व सोयी सुविधांची तपासणी करणे व यासाठी निधी आवश्यक-असल्यास संबंधीत यंत्रणेकडे पत्राद्वारे तातडीने पाठपुरावा करणे.

(१०) लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे काळजी घेणे तसेच निवडणुकांबाबत , उपाययोजना या विषयावर चर्चासत्र घेणे.

(११) मतदार यादीत महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे अशा मतदार केंद्रांचा शोध घेऊन त्याठिकाणी महिला मतदारांचे नाव नोंदणीकरीता विशेष मोहिम राबविण्यात यावी, इत्यादी.

वरील मुद्यांसंदर्भात आपल्या मार्गदर्शनार्थ प्रसिध्दी साहित्याचे आयोगाकडे उपलब्ध असलेले उत्कृष्ट नमुने आपणास लवकरच ई.मेलद्वारे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील-

जनाबाबत पर्याप्त कालावधी उपलब्ध असल्यानेसदर कार्यक्रमाच्या नियो या कार्यक्रमाचे परिपूर्ण नियोजन करण्यात यावे. याद्दष्टीने तालुका व जिल्हा स्तरावर प्रारुप कृती आराखडा तयार करून तो विभागीय आयुक्तांमार्फत तसेच महानगरपालिकांच्या बाबतीत मनपा आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयोगास परस्पर दि. ३१ जुलै २०१९ पर्यंत सादर करण्यात यावा .तसेच या अहवालासोबत उक्त विषयी विभागीय व जिल्हा पातळीवर कार्यक्षम नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याबाबतचा तपशील (नोडल अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक,ई-मेल आयडी, पद, कार्यक्षेत्र, इ.)

यासंदर्भात आपणाकडून येत असलेल्या कामगिरीचा आढावा ऑगस्ट-२०१९ मध्ये मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात येईल.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार .

आपला,

( राजाराम झेंडे )
सह सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी -:
सचिव (सर्व विभाग)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व विद्यापीठे
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
निवड नस्ती.

ई-मेल
१२/६/१९

# परिशिष्ट-१

## लोकशाही पंधरवडा-२०२० सदंर्भात दिनांक निहाय कृती आराखडा (नवीन मुद्यासंदर्भात)

| अ.क्र. | दिनांक | राबविण्याचे कार्यक्रम | कोणी राबवयाचे | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | (पूर्वतयारी) | (१) प्रत्येक महानगरपालिका, नगरपरिषदा व जिल्हयातील मोठया आकाराच्या (१८सदस्यीय) किमान २५ ग्रामपंचायतीमध्ये "लोकशाही निवडणूका व सुशासन" या विषयाचे किमान १० होर्डिंग्ज बॅनर्स लावण्यात यावेत, तसेच या ग्रामपंचायतींसह इतर ग्रामपंचायतींच्या दर्शनी ठिकाणी (प्राथमिक आरोग्य केंद्र, बस स्टँड, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा इ.) पोस्टर, कापडी फलक लावण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना निर्देशित करावे.<br>(२) स्थानिक टिवी केबलवर तसेच रेडिओ चॅनलवर किमान ३० सेकंदाची "लोकशाही निवडणूका व सुशासन" या विषयावर जिंगल्स तयार करून ते २६ जानेवारी, ते १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत प्रसारीत करणे.<br>**उदा: १. "जागरुक नागरिक मी भारताचा .... हक्क बजावीन मतदानाचा।"**<br>**२. "माझा देश, माझी लोकशाही .... टिकविन ती, लावून बोटाला शाई!"**<br>(३) आगामी काळात होणा-या निवडणूकांसाठीच्या संभाव्य मतदान केंद्रातील सर्व सोयी-सुविधांची तपासणी करणे व यासाठी निधी आवश्यक असल्यास संबंधीत यंत्रणेकडे पत्राद्वारे तातडीने पाठपुरावा करणे. | विभाग अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी, मंडळ अधिकारी/विस्तार अधिकारी/तलाठी/ग्रामविकास अधिकारी-ग्रामसेवक | मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार |
| २ | २६ जानेवारी २०२० | (१) २६ जानेवारीसह सर्व प्रमुख दिवशी लोकप्रतिनिधी/ प्रमुख वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत-कमी ३ ते ४ वाक्ये अंतर्भूत करणे.<br>भाषणामध्ये अंतर्भूत करावयाचा परिच्छेद: **"आपण साजरा करीत असलेल्या प्रजासत्ताक दिन हा लोकशाहीचा उत्सव असून विविध प्रयत्नांमुळे आपली लोकशाही अधिकाधिक मजबूत होत आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाची कास धरणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधींचे १५० वे जयंती वर्ष आहे तर त्यांच्या स्वप्नाची पूर्तता करणाऱ्या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे, हे लक्षात घेता या वर्षामध्ये व त्यापुढे होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये** | सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख लोकप्रतीनिधी. | मनपा आयुक्त /विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी, पंचायत समिती/तहसिलदार/ मुख्याधिकारी नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सर्व मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून सहभाग घेणे आहे. तसेच स्वत:बरोबर इतर सहकाऱ्यांनाही मतदानाच्या कर्तव्यासाठी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे". (२) महाविद्यालयांमध्ये प्रती वर्षी मतदार नोंदणी मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी करणाऱ्या पहिल्या शंभर विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र उपजिल्हा निवडणूक अधिकारी वा तत्सम अधिकाऱ्यांमार्फत प्रदान करणे. | | |
| ३ | २७-३१ जानेवारी २०२० | १) मा. राज्य निवडणूक आयोग हे शासनापेक्षा स्वतंत्र असल्याचे व त्याबाबतची सविस्तर माहिती वृत्तपत्र व साप्ताहिक यामध्ये प्रसिध्द करणे.<br>२) व्यापारी, उदयोगपती यांची बैठक घेऊन मतदार यादी जागृती अभियानाची व्यापक प्रसिध्दी करण्यासाठी त्यांचे सहकार्य उपलब्ध करून घ्यावे.<br>३) **आयोगाने केलेल्या खालील निवडणूक सुधारणांबाबत प्रसिध्दी देणे:-**<br>• नामनिर्देशनपत्रासोबत शपथपत्र व उत्पन्नाचा गोषवारा देणे आवश्यक केले.<br>• याचबरोबर उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीविषयक माहिती मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली.<br>• अक्षम नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली.<br>• True Voters व COP यासारख्या मोबाईल ॲपची निर्मिती केली जेणेकरून उमेदवार व मतदार यांच्या सोयीबरोबरच आदर्श आचारसंहितेचे स्थानिक पातळीवर कोटेकोरपणे पालन करता येणे शक्य होईल.<br>• NOTA ला सर्वाधिक मते पडल्यास अशा जागी फेर निवडणूक घेणे.<br>• राजकीय पक्षांनी निवडणूकीच्यावेळी दिलेल्या आश्वासनांच्या पुर्ततेसंदर्भात जनतेसमोर दरवर्षी अहवाल ठेवावा.<br>• टपाली मतपत्रिका सैन्यात काम करणा-या सीमेवरील जवानांनाही मतदानाचा अधिकार प्राप्त.<br>• प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या | मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/उपमुख्यकार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार | विभागीय आयुक्त |

३१५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | टप्प्यांवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राह्य धरण्यात येणारा दिनांक घोषित करण्यात येत असल्याने नव्या मतदारांना मतदार यादीत नोंदणीसाठी पूर्वसूचना मिळते. | | |
| ४ | १ -३ फेब्रुवारी २०२० | १) १८ व १९ वर्षे वयोगटातील विदयार्थ्यांची निश्चिती करून त्यांचे नाव मतदार यादीत अंतर्भूत करण्यासंदर्भात जिल्हा निवडणूक कार्यालयाशी महाविदयालयांनी समन्वय साधणे व महाविद्यालयाच्या परिसरातच अशा विद्यार्थ्यांकडून मतदार नोंदणी फॉर्म गोळा करण्यासाठी कक्ष उभारणे.<br>२) महाविदयालयीन विदयार्थ्यांकडून शाळेच्या कंपाऊंड वॉलसह मुख्य मार्गिका, शहारातील दळणवळणाच्या प्रमुख ठिकाणी (उदा. रेल्वे व पादचारी पूल इ.) मतदार जागृतीबाबत आकर्षक सचित्र संदेश रंगविणे. | प्राचार्य, महाविद्यालय/ मनपा विभाग अधिकारी गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार/ | संबधित जिल्ह्यात असलेल्या विद्यापिठाचे उपकुलगुरु/ मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/उप मुख्यकार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार |
| ५ | ४-६फेब्रुवारी २०२० | (१) मतदार यादीत महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे अशा मतदार केंद्रांचा शोध घेऊन त्याठिकाणी महिला मतदारांचे नाव नोंदणीकरीता विशेष मोहिम राबविण्यात यावी.<br>(२) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (प्रामुख्याने शहरी भागातील) इतर भाषिक मतदारांना निवडणूकीचे महत्व पटवून देण्यासाठी व निवडणूकीतील त्यांचा सहभाग वाढवून निवडणुकीची टक्केवारी वाढविण्यासाठी संबंधित ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत जनसामान्यांची **"चुनाव पाठशाला"** आयोजित करणे. | मनपा विभाग अधिकारी गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार | मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/उपमुख्यकार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार |
| ६ | ७-१० फेब्रुवारी २०२० | (१) लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांबाबत काळजी घेणे, तसेच "निवडणुक सुधारणा-उपाययोजना "या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र घेणे.<br>(२) आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था उदा. "Lions Club, Rotary Club" यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीम राबविणे. | मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/उप मुख्यकार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गटविकास अधिकारी पंचायत समिती/तहसिलदार | विभागीय आयुक्त |

**टिप-१.सदर कृती आराखडा निदेशात्मक (मार्गदर्शनपर) असून यामध्ये स्थानिक परिस्थीतीनूसार आपल्या स्तरावर परस्पर बदल करण्यात यावा.**